## दस्त नोदंणी नाकारण्याच्या आदेशाविरुध्द अपीलावरील कार्यवाही.

## Appeal against order of refusal of Registration

### विषय ओळख (About)

दुय्यम निबंधकाने त्याचेसमोर नोदंणीस सादर केलेला दस्त, नोंदणीस सादर करुन घेण्यास नकाराचे आदेश पारीत केल्यास, अशा आदेशामुळे व्यथीत झालेली व्यक्ती त्याविरुध्द जिल्हा निबंधक यांचेकडे कलम 72 नुसार अपील दाखल करु शकतात. असे अपील दुय्यम निबंधकाचे आदेशापासुन 30 दिवसांच्या आत दाखल करणे आवश्यक असते.

अशा अपीलावर जिल्हा निबंधक आवश्यक ती कार्यवाही करुन, अपील मान्य केल्यास ,दस्त नोंदणी करण्याचे आदेश दुय्यम निबंधकाना देतात. अपील अमान्य केल्यास, अशा अपीलातील निर्णयाचे विरुध्द संबधीत अपीलकारास, जिल्हा न्यायालयात सूट दाखल करता येते. अधिक माहीतीसाठभ्‌ सारथी < दस्त नोंदणी< दस्त नोदंणी प्रक्रीया< दस्त नोदंणी नकार व त्याविरुध्द अपील पहावे.